**3 tier station of metro line 9 is 65% completed**

**Mumbai, 24 February, 2023:**

Medetia Nagar Metro Station of Metro line- 9 is having 3 tiers in which 1st tier is flyover for vehicles, Concourse Level on 2nd tier and Platform Level is on 3rd tier. The total height of this station is 35 meters from road level. This station is 65 % completed, also all cast in situ elements with all piers upto platform level completed now pier cap erection work is in full swing. All stations work in this alignment is 51% completed.

MMRDA constructing 10.58 km Mumbai metro line 9 consisting 8 stations connecting Mumbai Suburbs to Mira-Bhayandar city.

This line will be having two interchange metro stations along metro alignment. First interchange station is at Dahisar (E) with interchange for Metro Line 7 (Gundavali to Dahisar (E)) and Metro Line 2A (Andheri (W) to Dahisar (E)) & the second interchange is at Miragaon metro station with line 10 (Gaimukh to Shivaji Chowk).

**"Integration with different transport systems in Mumbai is challenging part as Mumbai never sleeps. Metro Line 9 will be the finest example of integrated transport System of MMR. After the completion of Metro projects the pattern of Travel in MMR will be much more robust, connected & sustainable,"** said Shri S.V.R. Srinivas IAS, Hon Metropolitan Commissioner, MMRDA.

मेट्रो मार्ग ९ मधील ३ स्तरचे स्थानक 65 % पूर्ण

मेट्रो मार्ग ९ ची ५५ टक्के स्थापत्य कामे पूर्ण

मुंबई, 24 फेब्रुवारी, 2023:

मेट्रो मार्ग - ९ चे मेदेतीया नगर मेट्रो स्थानक हे तीन स्तरांचे (टियर्सचे) आहे ज्यामध्ये पहिल्या स्थरावर वाहनांसाठी उड्डाणपूल असणार आहे, तर कॉन्कोर्स लेव्हल दुसऱ्या स्थरावर असेल आणि प्लॅटफॉर्म हे तिसऱ्या स्तरावर असणार आहे. या स्थानकाची एकूण उंची रस्त्याच्या पातळीपासून ३५ मीटर आहे. हे स्टेशन 65% पूर्ण झाले आहे, तसेच प्लॅटफॉर्म स्तरापर्यंत सर्व पीयर्ससह सर्व घटकांमध्ये कास्ट केले आहे. आता PPC उभारणीचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. या संरेखनातील सर्व स्थानकांचे काम ५१% पूर्ण झाले आहे.

मुंबई मेट्रो मार्ग ९ ही मुंबई उपनगरांना मीरा-भाईंदर शहराला सोबत जोडणारी १०.०८ किमीची मार्गिका आहे ज्यामध्ये ८ उन्नत स्थानकांची समावेश असेल.

या मेट्रो मार्ग ९ ही मेट्रो ७ चा उत्तरेकडील विस्तार आहे. ही मेट्रो मार्गिका इतर मेट्रो मार्गिकांपेक्षा वेगळी आहे, कारण या मेट्रो मार्गिकेत दोन आंतरबदल मेट्रो स्थानक असणार आहेत. पहिलं आंतरबदल स्थानक हे दहिसर असेल. जिथून मेट्रो मार्ग ७ साठी आणि मेट्रो मार्ग २ अ साठी आंतरबदल करता येईल आणि दुसरे स्थानक मिरागाव मेट्रो स्थानक हे असेल जिथून मेट्रो मार्ग १० सोबत आंतरबदल करता येईल.यात वाहनांच्या वाहतुकीसाठी उड्डाणपूलासह ३ किमीचा डबल डेकर मेट्रो व्हायाडक्ट आहे. हे उड्डाणपूल विविध जंक्शन्सवरील रहदारी कमी करण्यासाठी बांधण्यात आले आहेत. पहिला उड्डाणपूल हाटकेश जंक्शन आणि सिल्व्हर पार्क जंक्शन येथे वाहतूक सुरळीत करण्यासाठी बांधण्यात आला आहे, तर दुसरा उड्डाणपूल एस.के. स्टोन (नयानगर) जंक्शन आणि कनाकिया जंक्शन येथे रहदारी कमी करण्यासाठी बांधण्यात आला आहे. तसेच दीपक हॉस्पिटलजवळ तिसरा उड्डाणपूल असेल जो भाईंदर स्टेशनच्या दिशेने वाहतूक सुरळीत करेल. तसेच काशिमिरा राष्ट्रीय महामार्गाच्या उड्डाणपुलावरून मीरा-भाईंदरला थेट कनेक्ट करणारा कनेक्टर असेल. या मार्गामुळे प्रवासाचा वेळ ५० ते ७० टक्के वेळ वाचण्यास मदत होईल. तसेच दहिसर टोल प्लाझावरील सर्वात व्यस्त रहदारी टाळण्यासाठी प्रवाशांना दिलासा मिळेल.

**"मुंबईतील विविध वाहतूक व्यवस्थांसोबत एकत्रीकरण करणे हा आव्हानात्मक भाग आहे, कारण मुंबई कधीही थांबत नाही. मेट्रो मार्ग ९ ही मुंबई महानगर प्रदेशाच्या एकात्मिक वाहतूक व्यवस्थेचे उत्कृष्ट उदाहरण असेल. मेट्रो प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई महानगर प्रदेशामधील प्रवासाची पद्धत आणखीन सुधारेल"** असे माननीय महानगर आयुक्त, श्री एस.व्ही.आर. श्रीनिवास भा. प्र.से. म्हणाले.







